माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ४७१/२०२२**

**अपिलार्थी, श्री. आनंदराव सोमाजी धारणे**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा महसुल सहाय्यक**
तहसिल कार्यालय, चंद्रपूर, ता.जि. चंद्रपूर

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार**
तहसिल कार्यालय, चंद्रपूर, ता.जि. चंद्रपूर

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १२.०८.२०२४**

**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २४.०५.२०२१ | २८.०५.२०२१ | ०३.०७.२०२१ | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक २४.०५.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " दिनांक २९.०७.२०१६ अर्जाचे संदर्भातील दर्शित महाराष्ट्र शासन निर्णय अ.क्र. १ ते ४ मधील दिलेल्या निर्देशाप्रमाणे व अद्यावत धोरणाप्रमाणे क नमुण्यातील अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र उपजिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे कडून प्राप्त करुन पाठविण्यात यावे, याबाबत माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८.०५.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, आपण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागविलेल्या माहितीबाबत आपणास नेमकी कोणती माहिती पाहिजे याचा अर्थबोध होत नाही तसेच आपणास पाहिजे असलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेवून उपलब्ध करुन देणे, माहितीचे संस्करण करुन देणे या स्वरुपातील माहितीचा अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याखेत समावेश होत नसल्यामुळे आपणास माहिती पुरविणे शक्य नाही, असे अपिलार्थीस कळविले. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ०३.०७.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे " अद्याप माहिती देण्यात आलेली नाही " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी सुचना जारी केल्या, मात्र प्रत्यक्षात कोणतीही सुनावणी अथवा कोणतेही आदेश पारित केल्याचे कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक २१.०२.२०२२ रोजी** " ४५ दिवसाचा कालावधी संपुनही अपिलीय अधिकाऱ्याकडून काहीच निर्णय अगर उत्तर मिळाले नाही " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक १२.०८.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या जोडपत्र अ नुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी नेमक्या मागितलेल्या माहिती बाबत कुठलाही अर्थबोध होत नसुन, आपणास पाहिजे असलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाकडून प्राप्त करुन उपलब्ध करुन देणे तसेच माहितीचे संस्करण करुन देणे, अथवा कार्यवाहीची अपेक्षा करणे किंवा एखाद्या विशीष्ट पद्धतीने कार्यवाही करणे तसेच माहिती तयार करुन देणे. (Information Creation) ही बाब माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) प्रमाणे स्पष्ट दिलेला माहिती यात शब्दाच्या व्याखेत मोडत नसल्याचा प्रतिसाद दिलेला आहे. त्याविरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक ०३.०७.२०२१ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला असुन, त्यावर तत्कालीन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार, चंद्रपूर यांच्या वतीने सुनावणी घेण्यात आली असुन, दिनांक ३०.११.२०२१ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी याआधीच आदेश पारित केला असुन, अपिलार्थी यांना अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राची अपेक्षा असुन, माहिती अधिकाराअंतर्गत अशा प्रकारची कार्यवाही करण्याची मागणी करणे हे अपेक्षित नसल्याचे यात नमुद केलेले आहे. त्यामुळेच अपिलार्थी यांनी सादर केलेला विनंती अर्ज त्या अनुषंगाने दाखल केलेला द्वितीय अपील अर्ज हा तथ्यहीन असुन फेटाळण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील फेटाळण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १२.०८.२०२४**

जावक क्रमांक 7273 दिनांक 4 OCT 2024